ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "श्रीक्षेत्र ताहराबाद यात्रा उत्सव: ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अभ्यास"



**वैशाली नामदेव डौले**
संशोधक विद्यार्थी न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर
**डॉ. मीना साळे**
संशोधन मार्गदर्शक न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर

**गोषवारा:**

देवदेवतांच्या किंवा संताची जयंती व पुण्यतिथीनिमित्ताने त्यापरीसरातील भाविक मोठ्या संख्येने एकत्र येतात,त्याला जत्रा किंवा यात्रा असे म्हणतात. राहुरी तालुक्यातील ताहाराबाद देवस्थानची महाराष्ट्राची दक्षिण काशी व वारकराचे प्रतीपंढरपूर म्हणून ओळख आहे.राहुरी तालुक्यातील देवस्थानात ताहराबाद महत्वपूर्ण आहे. हे केवळ देवस्थान नाही. सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक केंद्र आहे.

**बीजशब्द:** ताहाराबाद,महिपतीमहाराज, यात्रा ,उत्सव,सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक

## प्रस्तावना:

ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा व संताची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा होय याच जिल्ह्यातील राहुरी तालुका हा दंडकरण्याचा भाग म्हणून ओळखला जाणारा राहुरीचे अस्तित्व प्राचीन मानले जाते.अरण्याचा भाग असल्याने वांबोरी ला वाल्मिकी तीर्थ,धामोरीला भारव्दाज,भेर्डापूर भृगु ऋषीमुनीचे आश्रम होते. संताचा पद स्पर्शाने पावन म्हणून ओळख असणाऱ्या राहुरी तालुक्यात श्रीक्षेत्र ताहराबाद महिपती महाराज मंदीर,देवळाली प्रवरेतील त्रिंबक स्वामी,वांबोरीतील खोलेश्वर,राह्रीचीमाहेरवाशीण तुळजाभवानी, शनीमंदिर, राहू-केतू मंदिर,मनोरीची रेणुकामाता,ब्राम्हणीची बल्लाळआई, टाकळीमियातील मियासाहेबांचा दर्गा बेलापूरचे हरिहर केशव गोविंद मंदीर असा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे.यांपैकी ताहराबाद येथील महिपती महाराज मंदिर वैशिष्ट्यपूर्ण आहे.[१]

## संशोधनाची उद्दिष्टे

1. ताहराबाद यात्रेच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी चा अभ्यास करणे.
2. गावाच्या आर्थिक विकासात देवस्थानाचे महत्व जाणून घेणे.

3. सांस्कृतिक संर्वधनांत ताहराबाद देवस्थानच्या भूमिकेचा अभ्यास करणे
4. यात्रा उत्सवाने घडवून आणलेले समाजप्रबोधनाची माहिती जाणून घेणे.

### संशोधनाची गृहीतके

1. यात्रा उत्सवांमुळे आर्थिक विकास घडून येण्यास मदत झाली.
2. ताहराबाद देवस्थान मंदीर संस्कृती जतनाचे महत्वाचे केंद्र आहे
3. यात्रा उत्सवात भाविक येत असल्याने दळणवळण साधनांचा विकास होत आहे.
4. उत्सवावेळी लोक एकत्र आल्याने समता प्रस्थापित होऊन एकोपा निर्माण होणास मदत झाली.

### ताहराबाद पूर्व इतिहास

राहुरीच्या पूर्वेस डोंगर माथ्यावर असलेलं ताराबाद हे गाव. ताहराबद्च्या पूर्वेला घोरपडवाडी,वडनेर,पश्चिमेस वरशिंदे,खरशिंदे उत्तरेला निंभेरे,तांभेरे दक्षिणेला चिंचाळे,गडदे आखाडा, गावे आहेत.ताहराबादचे पूर्वीचे नाव वर्जूवाडी होते. नंतर काळात ताहराबाद नाव कसे पडले याविषयी दोन आख्यायिका सांगितल्या जातात. पहिली म्हणजे छत्रपती राजारामांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी ताराबाई वर्जूवाडीला या ठिकाणी येऊन राहत होत्या. त्यांच्या वास्तव्याने सारे आबादी आबाद झाले त्यामुळे तारा आबाद म्हणून, ताहराबाद हे नाव पडले.२ दुसरी आख्यायिका असे सांगितले जाते की, मोगल बादशहाकडून ताहीर खानास हे गाव जहागिरीचं होतं म्हणून देण्यात आले होते. त्यामुळे वर्जूवाडीस ताहराबाद म्हंटले जाऊ लागले. पूर्वी या गावात एक किल्ला बांधला होता त्याचे अवशेष आजही पाहावयास मिळतात निजामाच्या काळात मोहम्मद ताहीरना वरशिंदे हे गाव जहागिरी दिले होते. त्यावेळी त्यांनी हा किल्ला बांधला होता. पुढे किल्ल्या भोवती लोकांची दाट अवस्थेत तयार झाली होती.

### महिपती महाराजांचा जीवन परिचय :

सदगुरु महिपती महाराजांचा जन्म इ.स. १७१५ मध्ये राहुरी तालुक्यातील ताराबाद येथे झाला. त्यांचे मूळ गाव मंगळवेढा असून, नोकरीच्या निमित्ताने ते ताराबाद येथे आले. ते विठ्ठल भक्त होते संत महिपती महाराज दरवर्षी आषाढी वारी न चुकता करीत असे त्यांची पांडुरंगावर नितांत श्रद्धा होती. परंतु पुढे वय झाल्याने व प्रकृती ठीक नसल्याने त्यांची वारी चुकली त्यामुळे विठ्ठल रुक्मिणी त्यांना भेटण्यासाठी ताहराबादला आले होते अशी आख्यायिका आहे.संत महिपती महाराजांचे जन्मस्थान व समाधी स्थान असल्यामुळे ताहराबाद गाव राहुरी तालुक्यात प्रसिद्ध आहे. महिपती महाराजांचे गुरु मोरोबा तांभेरेकर होते. गुरुंच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी भजन, कीर्तन, आणि संतचरित्र लेखनाला वाहून घेतले.संत परंपरेचे गाढे अभ्यासक असलेल्या महिपतीमहाराजांनीभक्तविजय ,संतलीलामृत, भक्तलीलामृत, संतविजय, कथासारामृत, पंढरीमहात्म, गणेशपुराण, पाडुरंगस्तोत्र, मुक्ताभरणव्रत, ऋषीपंचमी महात्मयासारखे ग्रंथ लिहिले. त्यामुळे ते संतचरित्रकार म्हणून ओळखले जातात.३

### श्रीक्षेत्र ताहराबाद देव स्थानच्या यात्रा उत्सव :

संत महिपती महाराजांना पंढरपूरच्या वाळवंटात स्वयंभू विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती सापडली होती. त्यांनी ताहराबाद येथे विठ्ठल रुक्मिणी च्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. आज तेथे भव्य दिव्य मंदिर आहे. इ.स.१९८८ ला ताहाराबाद ट्रस्टची स्थापना झाली.आषाढ वद्य दशमी ते आमवस्या उत्सव साजरा होतो.या कालखंडात गावात मोठी यात्रा भरते.[४]या यात्रेत पान,फुल,नारळ,फुलांचे हार,गुलाल पूजेच्या साहित्यचे दुकाने,लाकडी वस्तूची दुकाने,शेतीची अवजारे,मिठाईची दुकाने,भांडाची दुकाने,पाळणे,थंडगारपेय,खेळणांची,घरगुती वापरातील वस्तू ,सौंदर्यप्रसाधने,करमणूकीची साधने यासारखी दुकाने असतात.आजूबाजूचा परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते.या उत्सवात होणारी उलाढाल ही लाखोरुपयात होताना दिसते.निधी,देणगी,वर्गणी स्वरुपात मोठी रक्कम जमा होऊन मंदीर विकासात हातभार लावला जातो.भाविकांना ये-जा करण्यासाठी रस्तांची कामे होऊन दळणवळण साधने वाढली.या यात्रेत स्थानिक दुकानदारांच्या व्यवसाय वाढ होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारली,गावातील कामगार,कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन गावांचा आर्थिक विकास झाला.या देवस्थानच्या पंढरपूर या ठिकाणी मोठा मठ आहे. या देवस्थानच्या माध्यमातून पंढरपूर,आंळदी,पैठण,त्र्यंबकेश्वर याठिकाणी प्रत्येक वर्षी पायी दिंडी सोहळा जात असतो. इ.स.१९९९ मध्ये ‘क’ वर्गात देवस्थानात समावेश होऊन विविध शासकिय योजनेतून देवस्थानाचा विकासास हातभार लागत आहे.[५]

### सांस्कतिक विकास :

राहुरी शहरापासून बारा किलोमीटर असलेले व वारकरी सांप्रदायचे प्रतिपंढरपूर म्हणून संबोधले जाणारे राहुरी तालुक्यातील श्री क्षेत्र ताहराबाद होय.आषाढी एकादशीनंतर येणाऱ्या एकादशीला ही यात्रा येते. पंढरीच्या वारीस जाणारे सर्व वारकरी या सोहळास येतात.एखाद्या सण-उत्सव सारखा हा सोहळा साजरा होतो.तीन दिवस चालणारा या उत्सवासाठी जवळपास याठिकाणी महाराष्ट्रातून विविध भागातून शेकडो दिंडी या सोहळ्यासाठी येतात.यामध्ये पाडूरंग महोत्सवाला महाअभिषकाने कार्यक्रमाला सुरुवात होऊन त्यात काकड आरती,पूजा,व्दादशी पारायणे हरिपाठ भजन,पालखीची मिरवणूक, काल्याचे कीर्तन दहीहंडीचा कार्यक्रम, मंदिरात अंथरलेल्या गुलालबुक्कावर पाडुरंगाच्या पाऊलखुणाउमटतात. या पाऊलघडीच्या सोहळा पाहण्यासठी भाविकांची मोठी गर्दी होते.[६] प्रत्येक घरी पाहुण्याची वर्दळ असल्याने पाहुण्याची सरबराई करण्यासाठी लगबग सुरु असते घरोघरी अन्नदान केले जाते. दिंडीमुळे ताहराबाद परिसरात भक्तीमय होऊन टाळ,मृदंग,गजरात अभंग,भजन,नामस्मरण केले जाते. भाविक गवळणी म्हणतात.फुगड्या खेळतात दिंडीत वारकरींचा मार्गावर सोयीसाठी पाणीवाटप,अन्नदान केले जातात.यावेळी भाविक,लहान-थोर, उच्च-नीच असा सर्व भेदभाव विसरून एकत्र येतात.दिंडी प्रवचन आणि कीर्तनाच्या माध्यमातून समाजात समाजातील समस्या, शिक्षणाचा प्रश्न, रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धा यांसारख्या विषयांवर विचार मांडले जातात. त्यामुळे समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट होण्यास मदत होते आणि लोकांच्या मनात आध्यात्मिकतेची आवड निर्माण होते. जनजागृती घडवली जाते.उत्सवाच्या निमित्ताने गावकरी एकत्र येऊन विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे गावात एकोपा वाढतो आणि सामाजिक निर्माण होते. याच उत्सवामुळे तरुणांमध्ये नेतृत्वगुणांची जोपासना होते.. उत्सव काळात विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबवले जातात, त्यामुळे सांस्कृतिक संवर्धनाला चालना मिळते. परिणामी गावाचा सांस्कृतिक विकास होतो.[६]

यात्रा कमिटीचा वतीने भाविकांची गैरसोय होऊ नये.म्हणून ज्यादा बसेच सुविधा उपलब्ध केल्या जातात.प्राथमिक आरोग्यसुविधा,गर्दी नियंत्रणासाठी स्वंयसेवकांच्या नियुक्त्या केल्या जातात.ताराबाद देवस्थानच्या विकासासाठी लोकवर्गणीतून ६१ फूट उंचीचा भव्यदिवस कळस उभारण्यात आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी भक्तनिवासाची उभारणी करण्यात आली असून, दोन भव्य सांस्कृतिक भवनांचे बांधकामही पूर्ण झाले आहे.देवस्थान परिसरात विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये स्वंयपाक घर, वाहनतळ, पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल आणि बागेचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे. तसेचदैनंदिन कार्यभार सुरळीत पार पाडण्यासाठी कार्यालयाची उभारणी करण्यात आली असून, त्याचा उपयोग मंगल कार्यालय म्हणूनही केला जातो.या सर्व विकासकामांमुळे गावाच्या वैभवात लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय, देवस्थानच्या माध्यमातून रुग्णवाहिकेचीही सुविधा सुरू करण्यात आली असून, त्यामुळे गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळू शकते. अशा प्रकारे ताराबाद देवस्थान केवळ धार्मिक केंद्र न राहता सामाजिक बांधिलकी जपणारे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे.[७]

सदगुरु महिपती महाराजांनी संतपरंपरेचा आणि भक्तिमार्गाचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांमुळे आजही आपल्याला संतांचे विचार आणि जीवनदृष्टी यांचा सखोल अभ्यास करता येतो. ताराबाद येथील त्यांचे मंदिर आणि वारी महोत्सव त्यांच्या कार्याचा सातत्याने जागर करत असतो.

## संदर्भ सूची


१) कदम अण्णासाहेब,राहुरी सहकारी साखर कारखान्याच्या रौप्यमहोत्सवी समारंभ निमित्त संकलीत केलेला स्मृती ग्रंथ, **'तपोधन'** महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय पुणे,१८८२ पृ.कृ.११०

२) प्रा. शेख जमाल, **'राहुरी तालुक्यातील पुरातन ऐतिहासिक मंदिरे आणि धार्मिक** स्थळे'प्रकाशक आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज राहुरी.२०१५ पृ.कृ.८६

३) जोंधळे भास्कर,**'श्रीमहिपती महाराज जीवन व कार्य'** पृ.कृ.२२

४) **सार्वमत,** राहुरी विभागीय कार्यालय वर्धापनदिन विशेष अंक २८ सप्टेंबर २०२४पृ.कृ.१३

५) वांळूज बाबासाहेब सोपानराव,संग्राहक **महिपती महाराज परिचय**,अनिता प्रिंटीगप्रेस देवळाली प्रवरा पृ.कृ.१५

६) मुलाखत :ह.भ.प.ढोकणे महाराज दिंडी चालक (उंबरे ते ताहराबाद)

७) मुलाखत हारदे दत्तात्रय,अध्यक्ष ताहराबाद यात्रा समिति





